जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
महसुल शाखा
क्र .PRH/PMRDA/NA/SR/१२६/१७
पुणे -१ दिनांक २६/१०/२०१७

प्रति,

कामगार तलाठी बकोरी
ता. हवेली जि.पुणे

विषय- जमीन पुणे.

मौजे बकोरी, ता.हवेली, जि. पुणे येथील जमीन ग. नं. १०३ पै. मधील ९०००.०० चौ. मी क्षेत्रापैकी रस्त्याखालील १८७.२६ चौ. मी क्षेत्र वजा जाता उर्वरीत ८८१२.७४ चौ.मी क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ अकृषिक झाल्याची नोंद घेणेबाबत..

संदर्भ :- १) अर्जदार श्री. विशाल अशोक छुगेरा रा.३२७/अ, नाना पेठ, पुणे-४११००२ यांचा दि.०७/१०/२०१७ रोजीचा अर्ज
२) महाराष्ट्र शासन,महसुल व वनविभाग यांचेकडील दि.०५/०१/२०१७ रोजीची अधिसुचना व शासन परिपत्रक क्र. एनए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दि.१९ ऑगस्ट २०१७

२/- मौजे बकोरी, ता.हवेली, जि. पुणे येथील जमीन ग. नं. १०३ पै. मधील ९०००.०० चौ. मी क्षेत्रापैकी रस्त्याखालील १८७.२६ चौ. मी क्षेत्र वजा जाता उर्वरीत ८८१२.७४ चौ.मी क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ अकृषिक आकारणी करुन मिळावी म्हणून अर्जदार श्री. विशाल अशोक छुगेरा रा.३२७/अ, नाना पेठ, पुणे-४११००२ यांनी या कार्यालयाकडे संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने आगाऊ बिनशेतसारा शासन जमा करणेबाबतच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अक्र	गावाचे नाव	तालुका	सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं.	
१	बकोरी	हवेली	ग.नं. १०३ पै.	
अक्र	जमिन मालकाचे नाव	सर्व्हे नं. गट नं	७/१२ नुसार एकुण क्षेत्र (चौ.मी)	बिनशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मी)
१	विशाल अशोक छुगेरा	१०३ पै	९०००.००	९०००.००
२	एकूण क्षेत्र		९०००.००	९०००.००
३	अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र			९०००.००
४	रस्ता रुंदीखालील क्षेत्र			१८७.२६
५	निव्वळ अकृषिक आकारणी करावयाचे क्षेत्र			८८१२.७४
६	रेखांकनाचे प्रयोजन			निवासी

अर्जदार यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. PRH/PMRDA/NA/SR/१२६/२०१७ दि.२४/१०/२०१७ अन्वये खालीलप्रमाणे बिनशेतसारा शासनजमा करणेबाबत कळविणेत आलेले होते.

अक्र	तपशील	
१	बिगरशेती आकारणी (क्षेत्र ८८१२.७४ चौ.मी.)	निवासी
२	बिनशेती आकारणीचा दर (प्रति ०.१० चौ.मी.)	
३	बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी	८८१.००
४	रुपांतरीत कराची आकारणी	४४०५.००
५	जिल्हा परिषद कर	६१६७.००
६	ग्रामपंचायत कर	८८१.००
७	अनधिकृत अकृषिक वापराबाबत ४० पट दंड	०.००
८	इनाम वर्ग ६ ची जमिन असल्याने ५० टक्के नजराना रक्कम	०.००
९	एकूण रक्कम रुपये.	१२३३४.००

वरीलप्रमाणे अर्जदार यांनी देय १२३३४/- एवढी रक्कम चलन GRN No.MH006519821201718M, दि.२४/१०/२०१७ शासनजमा करुन चलनाच्या प्रती या कार्यालयास सादर केलेल्या आहेत. तसेच विषयांकीत मिळकतीवरील बांधकाम नकाशास पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांचेकडील जा.क्र.DP/बीएचए/मौ.बकोरी,/ग. नं.१०३/प्र.क्र.१/१७-१८, दि.०४/१०/२०१७ अन्वये दिलेल्या प्रारंभ प्रमाणपत्राची व बांधकाम नकाशाची प्रत सादर केलेली आहे.

सबब, आपणास यादवारे कळविणेत येते की, विषयांकीत जमीनीच्या गाव नमुना नं. ७/१२ व गाव नमुना नं.२ मध्ये अकृषिक झाल्याची नोंद " (बिनशेतीकडे ८८१२.७४ चौ.मी) " निवासी प्रयोजनार्थ नोंद घेणेसाठी चलनाची व बांधकाम नकाशाची प्रत सोबत जोडली आहे. सदरची नोंद गाव दप्तरी घेणेत येऊन दुरुस्त अधिकार अभिलेखाची प्रत अर्जदारास उपलब्ध करुन देणेत यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दुरुस्त अधिकार अभिलेखासह सादर करावा.

मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने

जिल्हाधिकारी, पुणे करीता

प्रत: १) अर्जदार श्री. विशाल अशोक छुगेरा रा.३२७/अ, नाना पेठ, पुणे-४११००२

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण